# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पित

**दिनांक 21/3/2011 रोजी (का.प.क्रं.14) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 21/03/2011 रोजी (का.प.क्रं.14) मा.सभापती स्थायी समिती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.40 वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स.स.श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद

**चर्चा :**

श्री.मधुकर सावंत :मा.आयुक्तांना जो काळे फासण्याचा प्रकार झाला तो महाराष्ट्रात, भारतात दाखवला त्याचा निषेध करण्यांत येतो. काही लोक माहितीच्या अधिकारात माहिती घेवून गेट समोर उपोषणास बसून,ब्लॅकमेल करतात त्यातूनच ही घटना घडली हा निदंणीय प्रकार आहे.घटना घडल्यानंतर संबधीत लोक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाची घोषणा देवून समाजास वेठीस धरण्याचा प्रकार आहे या घटनेचा निषेध करावा दुसऱ्यांदा असे होवू नये अधिकाऱ्यांना कोणी वेठीस धरू नये. अधिकारी सर्वाचे आहे जनतेसाठी ते काम करतात.

श्री.रेणुकादास वैद्य : अधिकारी, पदाधिकारी, नगरसेवकात मतभेद असू शकतात त्यावर बोलण्यासाठी सर्वसाधारण, स्थायी समिती प्रभाग समितीच्या सभा होतात, व्यासपीठ आहे जे काही प्रश्न, अडचणी असतील चर्चेअंती तेथे सोडवू शकतो परंतु बाहेरच्या शक्ती येथे येवून बदनाम करतात.या गोष्टीचा तिव्र शब्दात शिवसेनेच्या वतीने धिक्कार करतो भविष्यात अशा घटना घडू नये जी प्रशासनाने उपाय योजना केली त्याचा आनंद व्यक्त करतो ही यंत्रणा कायमस्वरूपी ठेवावी.

श्री.विकास जैन :यापूर्वी लहान मोठया घटना घडल्या त्यावेळी ज्यांचे काम असायचे त्यांनाच प्रवेश दिला जात असे अशी कडक भुमिका प्रशासनाने घेतली होती दोन दिवसापासून जी सुरक्षा ठेवली ती यापूढे कायम असावी.कामानिमित्त महापालिकेत येणा-यांना ठराविक वेळ दयावा यापूर्वी दु 3 ते 5 भेटण्यासाठी वेळ दिलेली होती त्याप्रमाणे सुरू करावे कारण नसतांना अनेक लोक येतात. अशा घटना होतात मा.आयुक्त महापालिकेचे प्रमुख आहे त्यांचे बाबतीत अशी घटना घडते दु:ख वाटते सर्वांबरोबर हा प्रकार घडला असेच म्हणावे लागेल सर्व सदस्य प्रशासनाच्या पाठीशी आहोत.झालेल्या घटनेचा निषेध करावा.यानंतर अशा घटना होणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.जगदीश सिध्द :निषेध करण्यात यावा. माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती :महापालिकेच्या आवारात येवून काही समाज कंटकांनी मा.आयुक्तांना काळे फासले जो प्रकार घडला,सदस्यांनी नाराजीच्या भावना व्यक्त केल्या या घटनेचा निषेध करतो. असे पुन्हा होवू नये याची दखल घ्यावी संबधीतावर पोलीस प्रशासना मार्फत कार्यवाही होत आहे पोलीस प्रशासनाकडे आपण सर्वानी जावून या प्रकराबाबत भावना कळविल्या.या प्रकारामूळे मा.आयुक्तांनी मनाला लावुन घेवू नये. माथेफिरू लोक जे समाजाला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात त्यांचेवर पोलीसात गुन्हे दाखल केले त्यांना अटक झाली हे सभागृह सर्व सदस्य मा.आयुक्ताच्या पाठीशी आहे सुरक्षा तैनात केली ती कायम स्वरूपी ठेवावी असे प्रकार होणार नाही यापूर्वी श्री.सुर्यवंशी नावाचे अधिकारी यांना मारहाण झाली होती टप्पा क्र. 3 मधील इमारतीत अनेक लोक काम नसतांना अधिका-याकडे येवून बसतात माहितीच्या अधिकारात पत्र देतात धमक्या देवून कामात व्यत्यय आणतात दोन्ही इमारतीला कडक सुरक्षा तैनात करावी दुपारी 3 वाजेच्या आत स.सदस्य वगळता इतर बाहेरील व्यक्तीला महापालिकेत प्रवेश देतांना त्यांचे कुणाकडे काम आहे याची शहनिशा करूनच प्रवेश देण्यात यावा.

**विषय क्र. 212 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95, 103 व 104 नुसार मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन 2010-2011 चे सुधारीत व सन 2011-2012 या वर्षीचे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

मुख्यलेखाधिकारी :आजच्या अर्थसंकल्पीय सभेत सन 2010-11 चे सुधारीत व 2011-12 चे मुळ अर्थसंकल्प मा.आयुक्त सादर करतील त्यांना विनंती की त्यांनी सर्व प्रथम मा.सभापती स्थायी समिती यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे. स्थायी समितीचे सर्व सदस्यांचे लेखाधिकारी श्री.संजय पवार व श्री.दुर्राणी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे.

याच वेळी मा.आयुक्त हे मा.सभापती यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतात स्थायी समिती सदस्यांचे लेखाधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. याचवेळी मा.आयुक्त यांनी मा.सभापती, स्थायी समिती, यांचेकडे अर्थसंकल्प सादर करतात.

मा.आयुक्त :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या तरतुदीमधील कलम 95 अन्वये सन 2011-12 करीताचे महानगरपालिकेच्या कालावधीतील 29 वे मुळ अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक व कलम 103,104 नुसार सन 2010-11 चे सुधारित अंदाज असे दोन्ही आज मा.स्थायी समिती समोर सादर करीत आहे.

सन 2010-11 या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पात नमूद करण्यात आलेल्या बहुतांश विकास कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे तथापि सन 2010-11 या वित्तीय वर्षात एप्रिल महिण्यात महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुकीमूळे एप्रिल ते जुलै या कालावधीत लेखानुदान सादर केले होते तदनंतर महापालिकेचा मुळ अर्थसंकल्प पारित करण्यात आला त्यामूळे प्रशासकीय मान्यता दिलेले बहुतांश विकास कामे चालू वित्तीय वर्षामध्ये घेण्याचे चर्चा करून सर्वानुमते निर्णय घेण्यात आला त्या अनुषंगाने सन 2011-12 चे मुळ अंदाज सादर करण्यात येत आहे.

सन 2010-11 चा वित्तीय वर्षातील ठळक कामे :

औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थीक स्थिती बळकट करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून मालमत्ता कर वसुली मोहिम प्रभावीपणे राबविणेसाठी वार्डनिहाय सक्षम कर्मचा-यांची वसुली पथके नियुक्त केली होती मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली प्रभावीपणे करण्याचे अथक परिश्रम घेण्यात येत आहे तसेच महानगरपालका हद्दीतील मालमत्ता कराचे पुर्नमुल्यांकन व नविन मालमत्तेचा शोध घेण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे या पथकामार्फत जवळपास 15 हजार मालमत्ताचे सर्वेक्षण करण्यात आले. मालमत्ता कराची मागणी ही द्विनोंद लेखा पध्दतीनुसार विवरण पत्रात नमुद करणे, वस्तुनिष्ठ मागणी व त्या अनुषंगाने प्रभागातील प्रत्यक्ष मालमत्ता व मागणी रजिस्टरला घेण्यात आलेल्या नोंदी याची सांगड घालणे आवश्यक असुन या करीता प्रत्येक प्रभागात पथके निर्माण करून कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन निर्देशानुसार केंद्र शासन व राज्य शासनाचे विविध योजनांचे अनुदान प्राप्तीसाठी महानगरपालिकेचे लेखे द्विनोंद लेखा पध्दतीमध्ये ठेवणे बाबत कार्यवाही करण्यात येत असून जानेवारी 2011 पासून प्रायोगिक तत्वावर सुरूवात केली असून 1 एप्रिल 2011 पासुन नियमीत स्वरूपात द्विनोंद लेखा पध्दतीमध्ये नोंदी घेण्यात येतील त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.मालमत्तेचे मुल्यांकनानुसार मत्ता यादी व दायीत्व यादी यांचा समावेश त्या प्रमाणे सर्वेक्षण पुर्ण होत आहे व मुल्याकंन निश्चित होत आहे.

सिध्दार्थ उद्यान येथे भगवान गौतम बुध्दांचा पुर्णाकृती पुतळा उभारणी करण्यात आला असुन त्याचे उदघाटन करण्याच्या प्रतिक्षेत आहोत. सदर उद्यानात हैद्राबाद मुक्ती संग्रहालय स्थापना करण्यासाठी अंदाजपत्रकात रू.50.00 लक्षची तरतूद करण्यात आली आहे.

औरंगाबाद शहरात आजमितीस मोठया प्रमाणावर विविध कंपन्याचे अनधिकृत भ्रमणध्वनी मनोरे ठिकठिकाणी उभरलेले आहेत, अनधिकृत मनोरे सिल करण्याची मोठया प्रमाणावरील कार्यवाही करण्यात आली होती परंतु कोर्टात प्रकरण गेल्यामूळे सध्यस्थितीत सिल काढावे लागले कर वाढविण्या संदर्भात मोठी कार्यवाही प्रशासनाने केली आहे.समाजातील सर्व बांलकांना योग्य शिक्षण व त्यांचा संर्वागिण विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेले बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम -2009 ची अंमलबजावणी औरंगाबाद महानगरपालिकेनेही एप्रिल 2010 पासून सुरू केली असून महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार 6 ते 14 वयोगटातील 1983 विद्यार्थी शाळाबाहय असल्याचे निदर्शनास आले आहे यातील आजमीतीस जवळपास 775 शाळाबाहय विदयार्थ्यांना शाळांमध्ये प्रवेश दिलेला आहे या विद्यार्थ्यांना दैंनदिन उपस्थितीसाठी आणि शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना आधारभुत ठरेल असा भाऊ-दिदी उपक्रमाची सुरूवात करण्यात येत आहे त्याची राज्य पातळीवर सुध्दा कार्यवाही होत आहे. दिदी (प्रेरक) या प्रकल्पासाठी वार्ड शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने स्थानिक पातळीवरील स्वयंसेवक व बचत गट आणि शिक्षक यांच्या समन्वयाचे या उपक्रमांची अंमलबजावणी अपेक्षित आहे यासाठी अर्थसंकल्पात रू.10.00 लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे या माध्यमातून सातत्याने गैरहजर व शाळाबाहय विद्यार्थ्यांची शैक्षणिक काळजी नियमीतपणे घेतली जाईल.

मॉलीक्युलर लॅबः शहरातील नागरिकाचे विषाणुजन्य आजारासंबधीचे निदान स्थानिक पातळीवर करणेसाठी मॉलीक्युलर लॅब उभारण्याचा मानस आहे ज्यामूळे नागरीकाचे स्वाईनफ्ल्यु,डेंग्यू चिकनगुनिया, कावीळ ई. आजारांचे तात्काळ निदान होणे शक्य होईल.

केंद्र व राज्य शासन पुरस्कृत समांतर जलवाहिनी योजना कार्यान्वीत करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात आली असुन सन 2041 पर्यंत अस्तित्वात येणा-या नविन वसाहती व शहराची वाढती लोकसंख्या याचा विचार करून Central Public Health and Environmental Engieering Organization (cpheeo)च्या मानकानुसार 135 लि.प्रती व्यक्ती प्रती दिन पेय जल उपलब्ध करून देणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने समांतर जलवाहीनीची कार्यवाही Public Private Partnership (PPP)तत्वावर करण्यात येत असून व पुढील 20 वर्ष योजनेचे संचालन व देखभाल दुरूस्तीची रू.792.90 कोटीची निविदा मंजुरीच्या अंतिम टप्यात आहे.

सन 2011-2012 मधील ठळक वैशिष्टये:

स्थानिक संस्था कर : 1 एप्रिल पासून महानगरपालिका हद्दीत जकात कर रद्द करण्यात येऊन स्थानिक संस्था कर लागु करण्यात यावा असे शासनाने आदेशीत केले आहे. ही कार्यवाही प्रभावीपणे करण्यासाठी प्रशासन व आपल्या सर्वासमोर मोठे आवाहन आहे जकात इतके किंवा जकातीपेक्षा

जास्त पैसे यामाध्यमातून जमा करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.सन्मानीय लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्याने कर वसुलीसाठी प्रयत्न करण्यात येईल व या करीता शहरातील व्यापारी व औद्योगिक वसाहतीतील कंपन्या यांनी ठरवुन दिलेल्या कालावधीत नोंदणी करून प्रामाणिकपणे कर भरणा करावा असे मी त्यांना आवाहन करतो.

डिफर्ड पेमेंटवर रस्ते या वर्षी घेतलेले आहे चिकलठाणा औद्योगिक वसाहतीमधील रस्ते तसेच शहरातील महत्वाचे रस्ते आय.आर.सी.धर्तीवर डिफर्ड पेमेंन्ट तत्वावर अनुक्रमे रू. 20.00 कोटी व रू. 30.00 कोटीची करण्याचे प्रस्तावीत असून या करिता अर्थसंकल्पात विशेष तरतुद करण्यात आलेली आहे काही रस्त्याचे आज सर्वे करण्याचे ठरले त्यात काही रस्ते येतील.

Service Leval Bench Mark:- 13व्या वित्त आयोगाची अमंलबजावणी सन 2010-11 पासुन सुरू झाली असुन सदर वित्त आयोगामार्फत प्राप्त होणारा 50टक्के निधी पाणीपुरवठा, मलनि:सारण, धन कचरा व्यवस्थापण, पर्जन्य जल व्यवस्थापन इ.सेवांचा दर्जा सुधारणेच्या साध्यतेवर अवलंबुन राहणार आहे आणि मार्च 2012 पर्यंत कोणत्या सर्वीस लाईन कोणत्या लेव्हलवर जाणार याचे नियोजन करून शासनाकडे पाठवले आहे.

शहर स्वच्छता आराखडा :- केंद्र शासनाने राष्ट्रीय नागरी स्वच्छता धोरण दिनांक 03 ऑक्टोंबर 2008 रोजी स्विकृत केले आहे या धोरणानुसार भारतातील सर्व शहरे आरोग्य पुर्ण व स्वच्छ करावयाची आहे केंद्र शासनाने 19 निर्देशांकावर आधारीत सर्वेक्षणाद्वारे शहर स्वच्छता आराखडा तयार करण्यासाठी देशातील 423 शहरांची निवड केली यामध्ये औरंगाबाद शहराचा समावेश आहे त्याकरिता शहर 100टक्के हागणदारी मुक्त, आरोग्य पुर्ण आणि पर्यावरण समृध्द करावे या करिता शास्त्रशुध्द घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा उघडयावर शौचास बंदी, स्टॉर्म वाटर मॅनेजमेंन्ट, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर इत्यादी बाबीना प्राधान्य देणे आवश्यक राहील त्या अनुषंगाने कार्यवाही केली जात आहे.

एकंदरीत महापालिकेचे अपेक्षित उत्पन्न व खर्चाचा विचार करता सन 2010-11 चे सुधारीत अंदाज रू. 284 कोटी 40 लाख 25 हजार जमा प्रांरभीची शिल्लक रू. 05 कोटी 26 लक्ष 92 हजारसह एकुण रू. 289 कोटी 67 लाख 17 हजार जमा व खर्च रू- 289 कोटी 38 लाख 70 हजार विचारात घेऊन रू.28 लाख 47 हजार शिल्लकीचे सुधारीत अंदाज तसेच सन 2011-12 चे मुळ अंदाज रू.382 कोटी 20 लाख 25 हजार जमा, प्रांरभीची शिल्लक रू.28 लक्ष 47 हजारसह एकुण रू.382 कोटी 48 लाख 72 हजार जमा व खर्च रू. 382 कोटी 34 लाख 70 हजार विचारात घेऊन रू. 14 लाख 02 हजार शिल्लकीचे मुळ अंदाज स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

चालु वित्तीय वर्षाचे सुधारीत व सन 2011-12 चे मुळ अंदाज तयार करतांना माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन तयार केले आहे.

माझ्या कारकिर्दीत विविध योजना,प्रकल्प, विकास कामे सुरळीत पार पाडण्यासाठी मा.महापौर मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती मा.सभागृह नेता मा् विरोधी पक्ष नेता सर्व पक्षांचे गटनेते, सर्व प्रभागाचे सभापती सर्व सन्माननिय सदस्य यांनी मला मोलाचे सहकार्य केले व यापुढे ही करतील असा मला पुर्ण विश्वास आहे.

मागिल वित्तीय वर्षात राबविलेल्या प्रकल्प, योजना व विकास कामांना व्यापक प्रसिध्दी दिल्याबध्दल मी सर्व प्रसारमाध्यमांचा आभारी आहे आणि पुढे अशाच प्रकारचे सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.रेणुकादास वैद्य :मागिल वर्षाचे बजेट सादर करण्यास उशीर झाला त्यामूळे कामे झाली नाही अशी कारणे पुढे आली याचा खेद वाटतो असे असले तरी बजेट सादर करणे हे प्रशासनाचे काम असते. ते सादर झालेले आहे.अर्थसंकल्पावर एका विषयावर 15-20 मिनिटे बोलले गेले तरी 2-3 दिवस बैठक चालेल त्यासाठी वेळ वाया न जाता गतीने कामे होण्याची नागरीकांना आपल्याकडून अपेक्षा आहे.यात अनेक त्रुटी असतील त्या त्रुटी दूर करण्याचे अधिकार आम्ही सर्व सदस्य स.सभापतींना देवू इच्छितो.यात प्रस्तावित केलेली कामे त्वरीत सुरू व्हावी मागिल वर्षी अनेक देखभाल दुरूस्तीची कामे केली त्याची तरतूद संपली असेल. मा.सभापतींनी प्रत्येक वार्डात ड्रेनेज संदर्भात बैठक घेवून कोणत्या वार्डात किती रक्कम , कोठे व कशी खर्च केली याचा माहिती घेवून प्रश्न सोडविले वार्डात लहान मोठी कामे असतात.प्रत्येक वर्षी देखभाल दुरूस्तीसाठी बजेटमध्ये वार्ड समिती निहाय तरतूद करीत असतो मागिल वर्षी प्रत्येक वार्ड समितीसाठी 2.50 कोटीची तरतूद होती यातील 2 कोटीची कामे वार्ड अभियंता, कनिष्ठ अभियंता यांचे मताने करतात वार्डात कुठे काम करावे लागेल किंवा करायचे आहे. नगरसेवकांना माहित असते, दुर्देवाने नगरसेवकांची भुमिका विचारात घेतली जात नाही. त्यासाठी प्रत्येक वार्डात देखभाल दुरूस्तीसाठी ठराविक निधी ठेवावा त्यातून नगरसेवकांनी सुचविलेली शिफारस केलेली देखभाल दुरूस्तीची कामे करावी. वार्ड अभियंता, संबधीत अधिकारी यांनी करावी. ऐनवेळचा प्रस्ताव नगररचना विभागाकडून दिलेला आहे नगररचना विभाग व लेखा विभागाचे समन्वय नसल्याचे मोठा गोधळ निर्माण झाला याची जाणीव आपणांला आहे या प्रस्तावाचा यात समावेश करावे अनेक बारीक बारीक प्रश्न सदस्यांचे असतील परंतु कामे लवकर व्हावी हा मुळ उद्येश सर्वांचा असतो.मागिल वर्षीची वसुली किती झाली यावर बोलायचे ठरले तर प्रत्येक सदस्य नाराज आहे.वसुलीवर जेवढे लक्ष देणे आवश्यक होते तेवढे दिले नाही. शेवटच्या काळात वसुली वाढविण्यावर प्रशासन, पदाधिकारी यांनी भर दिला.वर्षाच्या पहिल्या दिवसापासून वसुली करण्याकडे लक्ष दिले तर निश्चित वसुली होईल जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लागणार आहे आम्ही या शहरातील

जनतेचे प्रतिनिधी म्हणून आमच्या तसेच व्यापाऱ्यांच्याही भावना विचारात घ्यायला पाहिजे. स्थानिक संस्था कर व जकातीलाही व्यापा-यांचा विरोध आहे स्थानिक संस्था कर लागणार असेल जकाती एवढेच अनुदान मिळावे अशी मागणी प्रशासनाने शासनाकडे करण्याची गरज आहे हे शक्य नसेल तर आता सद्या जकात वसुली करण्याची जी पध्दत चालू आहे तीच चालू ठेवावी अशी विनंती ही करण्याची गरज आहे.या अर्थसंकल्पात अनेक बारीक गोष्टी बोलण्या सारख्या असून त्या जाणीवपुर्वक आम्ही टाळत आहोत मा.सभापती यांना या बजेटमध्ये सर्व दुरूस्ती करण्याचे अधिकार आम्ही देत आहोत. यास मंजूरी देवून सर्वसाधारण सभेपूढे ठेवावे.

श्री.महेश माळवतकर :जास्त वसुली व्हावी यासाठी आपण 1 महिण्यापासून जे प्रयत्न करीत आहात त्याबध्दल सभागृहाच्या वतीने आपले अभिनंदन नगरसेवक निवडून आल्यानंतर विकास कामे झाली पाहिजे अशी सर्वसामान्य नागरीकाची अपेक्षा असते जे लोक नियमीत टॅक्स भरणा करतात तेच टॅक्स भरण्यासाठी पूढे येतात. कर न भरणारांचे धोरण वेगळे दिसते.जे मोठे थकबाकीदार मंगल कार्यालय,पेट्रोलपंप,हॉटेल,होर्डीग,टावर्स असतील व्यावसायच्या माध्यमातून हे लोक लाखो रूपये कमवितात परंतु टॅक्स भरणा करीत नाही अशावर कार्यवाही करण्याची गरज आहे 12 ही महिणे कर वसुलीची मोहिम चालू असावी. कर वसूल झाला तरच रॅमकीचे बील, लाईट बील, कर्मचाऱ्यांचे पगार हे नियमित करता येतील.सहा महिण्यापूर्वी एखादे केलेले काम ते आवश्यक किंवा कमी महत्वाचे असेल त्याचे बील देण्याचे घाई लेखा विभागाकडून होते कारण त्याची बजेटमध्ये तरतूद असते.परंतु पुढील काळात जे कामे येतील ते किती महत्वाचे आहे यांचे निरीक्षण व्हावे, आरोप होतील अशी चूक लेखा विभागाकडून होवू नये. ठेकेदार गरीब श्रीमंत हे न बघता जे रूटींगनुसार झालेली कामे त्याचे देयक दयावे, जकात बंद झाली तर स्थानिक संस्था कर व पाणीपट्टी, मालमत्ता कर हे महापालिकेची जमेची बाजू आहे त्याची सांगड घातली तरच जे बजेट सादर केले त्याचा ताळमेळ लागेल.कर भरणा करण्यासाठी नागरीकांना कसे प्रवृत्त करता येईल वेगळी मोहिम राबविता येते का यासाठी प्रयत्न करावे.

श्री.विकास जैन :सुधारीत व मुळ बजेट 382 कोटीचे प्रशासनाने सादर केले स.सदस्यांनी फक्त देखभाल दुरूस्तीसाठी वाढ सुचविली इतर कोणतीही वाढ सुचविली नाही. 1 एप्रिल पासून शासनाने जकात रद्य करण्याची घोषणा केली मागिल वर्षी मालमत्ता कर 70 कोटी होते सुधारीत मध्ये 40 वर आणले.30 कोटीची तफावत येते. कामे सुचविली जातील परंतु येणारे उत्पन्न कसे येईल यावरही चर्चा करणे महत्वाचे आहे.जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लावणार आहे त्याबाबतीत प्रशासनाचे काय नियोजन आहे याची माहिती तसेच मालमत्ता कर, पाणीपट्टी कशा पध्दतीने वसुल करणार याची माहिती देणे आवश्यक आहे. नेहमीच सुधारीत बजेट मध्ये वसुलीचे टारगेट कमी करून येते या वर्षी प्रशासनाने जे टारगेट दिले तेच मंजूर करीत आहोत तेवढी वसुली करणे प्रशासनाचे काम राहिल. प्रत्येक वार्ड मध्ये देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी 5

लक्ष खर्चाची वाढ सुचविलेली आहे ती जास्त नाही स्थानिक संस्था कर असेल मालमत्ता कर पाणीपट्टी प्रशासन कशा पध्दतीने वसुल करणार थोडक्यात माहिती दयावी.

उपआयुक्त (म) :1 एप्रिल 2011 पासून राज्यातल्या 4 महापालिकेत स्थानिक संस्था कर ज्याला आपण लोकल बॉडी टॅक्स म्हणतो तो लावण्याची अमलबजावणी करणेसाठी शासनाने जानेवारीत आदेश पारीत केले त्यानूसार स्थानिक संस्था कर लागू करायचा आहे. स्थानिक संस्था कर ही पध्दत इतर महापालिकेतील अनुभव लक्षात घेवून टप्याटप्याने महाराष्ट्रातील ड वर्ग महापालिकेत स्थानिक संस्था कराची आकारणी करण्याचे धोरण राज्य शासनाने आखलेले आहे. त्यात या महापालिकेचा समावेश आहे. स्थानिक संस्था कराच्या बाबतीत असे सांगता येईल की ज्यांची वार्षीक उलाढाल 1 लक्ष आहे त्या पासून त्याची सुरूवात होते अशा सर्वानाच एक फिक्स अमाऊंट भरावी लागणार आहे ज्यांची वार्षिक उलाढाल 1 लाख पेक्षा जास्त आहे त्या व्यापाऱ्यांना महापालिकेकडे नोंदणी करणे अनिर्वाय आहे राज्य शासनाच्या आदेशानुसार नोंदणी करण्याची प्रक्रिया 1 एप्रिल पासून हाती घेणार आहोत. प्रत्येक व्यापा-यास नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या व्यापाऱ्याकडे व्हॅट रजिस्ट्रेशन असेल व त्यांनी जरी महापालिकेकडे नोंदणी केली नाही तरी त्यांना रजिस्ट्रेशन म्हणून प्रमाणपत्र द्यायचे. त्यांचे कडून कोणतेही नोंदणी शुल्क घेणार नाही. व्हॅटच्या व्यतिरिक्त जे व्यापारी आहे त्यांचे कडून रू.100/- नोंदणी शुल्क आकारून रजिस्ट्रेशन करून घेणार आहोत. याप्रमाणे शहरातील व्हॅट खाली रजिस्ट्रेशन असलेले,बीएसटी-सीएसटी खाली रजिस्टर्ड असलेले, मुंबई टॅक्स रजिस्ट्रेशन नुसार रजिस्टर असलेले किंवा महापालिकेने ज्यांना व्यवसाय परवाना दिला त्यांचा व्यवसाय 1 लक्ष पेक्षा जास्त आहे या व्यतिरिक्त शहरात ज्यांचा व्यवसाय चालू आहे या सर्वांचा समावेश या एलबीटीच्या आकारणीच्या अंतर्गत केला जाणार आहे त्या दृष्टीने नियोजन केले येत्या कालावधीत व्यापाऱ्यासाठीचे प्रशिक्षण देणार आहे व्यापाऱ्यांना या कर प्रणाली संबधी गैरसमज असतील ते दुर करण्याच्या या वर्कशॉपच्या माध्यमातून प्रयत्न करणार आहोत. एकूण 176 कर्मचारी लागणार जे जकात,मालमत्ता विभागात पुर्वी होते इत्यादी कर्मचाऱ्यांचा विचार केला जाईल. कर्मचाऱ्यांनाही स्थानिक संस्था कराच्या संदर्भात प्रशिक्षण देणार आहोत. मागिल काळात ज्या महापालिकेला एलबीटी लागू झाली नांदेड, जळगाव व इतर महापालिका असेल यांचेशी प्रशासनाचा सातत्याने संपर्क,समन्वय आहे. दोन बाबी महत्वाच्या आहे पहिल्या टप्यात सर्वच व्यापाऱ्योचे रजिस्ट्रेशन करून घेणे जेवढे जास्त रजिस्ट्रेशन असणार तेवढे प्रमाणात एलबीटीच्या माध्यमातून वसुली असणार रजिस्ट्रेशनचा टप्पा व्यवस्थीत पार पाडल्यानंतर ज्या व्यापाऱ्याची उलाढाल 1 लक्ष समजून त्यांनी 1 हजार रक्कम भरणा केली 1 लक्ष पेक्षा जास्त उलाढाल आहे असे कळाले तर त्यांनी या कराचा चुकवण्याचा प्रयत्न केला आहे अशा वेळी त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याचे या नियमाअंतर्गत आहे. भरणा

करण्याचे चुकवले असे लक्षात आल्यास त्यांचेवर दडात्मक कार्यवाही करावी लागेल रजिस्ट्रेशन व इनफरमेशन अशा दोन बाबीमध्ये विशेष करून लक्ष देणार आहोत.

श्री.विकास जैन : व्हॅट मध्ये किली व्यापारी येतात यादी सेलटॅक्स ऑफिस मधून मिळू शकते परंतु व्हॅट मध्ये नसलेले व 1 लक्ष पेक्षा जास्त वार्षिक उलाढाल करणारे अनेक व्यापारी शहरात आहे यांना शोधणे हा मोठा प्रश्न असणार आहे आता 10 दिवस बाकी आहे एलबीटी लावण्या विषयी प्रशासनाने काय नियोजन केले.

उपआयुक्त (म) : ज्या व्यापाऱ्यांची नोंदणी झाली त्याचीही यादी प्राप्त केली शहरात अंदाजे रजिस्ट्रेशन असलेले 30 हजार व्यापारी असतील.

श्री.विकास जैन :बजेट मध्ये याची तरतूद किती केली .

उपआयुक्त (म) :150 कोटीची तरतूद केली 150 कोटीच्या अगेन्स मध्ये साधारण पणे पहील्या वर्षी एलबीटी कम्पलसरी करण्यासाठी शासनाने औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये 1 टक्का जादा दराने अधिभार लावण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे जी 5 टक्के स्टॅम्प डयुटी आकारली जाते ती 6 टक्के होईल 1 टक्का जास्तीने जो आकारला जाणार ते उत्पन्न महापालिकेला मिळणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :4 महापालिकेत एलबीटी लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला त्याचा अभ्यास प्रशासनाने केला का तेथील सद्यस्थिती काय तेथील प्रशासन सक्सेस झाले का याची माहिती दयावी.

उपआयुक्त (म.) :स्टॅम्पडयूटीचा एक टक्का महापालिकेला मिळणार आहे तशा सुचना स्पष्टपणे दिलेल्या आहे.

श्री.विकास जैन :मागिल वर्षी किती वसुली झाली.

उपआयुक्त(म) :125 कोटी वसुली मार्च पर्यत त्यांचा अंदाज आहे डिसेंबर पर्यत 100 कोटी वसूल झाले होते.5 टक्के प्रमाणे 125 कोटी वसुल झाले 1 टक्का प्रमाणे साधारणत 15-17 कोटी महापालिकेला मिळतील असा अंदाज आहे. वाहन प्रवेश शुल्क पुर्वी प्रमाणेच चालू राहणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :रहदारी फिस वसुलीसाठी खाजगी एजन्सी नेमली त्यावर महापालकेचा आज रोजी शुन्य खर्च आहे.भविष्यात रहदारी फिस महापालिकेला वसुल करावी लागली तर 12 कोटीसाठी 2-3 कोटी खर्च अस्थापनेवर होतील प्रत्येक नाक्यावर कर्मचारी दयावे लागणार आहे येथील व्यापा-यांना एलबीटी सुध्दा मान्य नाही येथील सद्य स्थिती व इतर तीन महापालिकेत काय झाले सोलापूर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने काय ठराव घेतला ही सर्व परीस्थिती राज्य शासनाकडे विनंती पत्राद्वारे कळवावी.

श्री.विकास जैन :176 कर्मचारी कोठून देणार आहे

श्री.रेणुकादास वैद्य :रहदारी फिस किंवा एलबीटी असेल यावर प्रशासनाचे नियत्रंण कोलमंडून जाणार आहे. 100 टक्के मॅन पावर वापरूनही 20-22 टक्के वसुली असते,व्यापा-याचा एलबीटीला आजही विरोध आहे. महापालिकेकडे असलेला कमी मॅन पावर व इतर महापालिकेत एलबीटीचा झालेला परिणात

याची माहिती कळवावी जी परीस्थिती आहे यापेक्षा जास्त चांगली होत नसेल तर, आहे तीच ठेवावी अशी विनंती राज्य शासनाला करावी.

श्री.विकास जैन :वसुलीचे जे आकडे दिले त्यात कुठली वाढ सभागृह करीत नाही वसुलीचे टारगेट दिले ते प्रशासनाने वर्षभर पूर्ण करावे अनेक कामाच्या निविदा झ ााल्या ठेकेदार काम करीत नाही जे काम करीत नसतील तर दुस-या क्रमांकाचे जे कुणी असेल त्यांना दयावे कार्यवाही करण्याची वेळ आली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:जे ठेकेदार काम करीत नाही त्याची यादी तयार करून सभागृहासमोर ठेवावी कार्यवाही करण्याचा निर्णय घेता येईल.

श्री.मधुकर सावंत :स.सदस्यांनी बजेटवर सांगोपांग चर्चा केली आहे.वसुली करणे हे एकच धोरण प्रशासनाने ठेवावे वसुली होत नसेल तर बजेटला अर्थ नाही.जकात रहावी यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे मा.पालकमंत्री यांनी जकात चालू ठेवू असे आश्वासन दिले आहे. पुढील प्रयत्न करावे बजेट मंजूर करण्या संदर्भात सभागृहाच्या वतीने सर्व अधिकार मा.सभापती यांना आम्ही देत आहोत. बजेट तयार करून सर्वसाधारण सभेकडे पाठवावे लवकरात लवकर कामे कसे होतील याकडे लक्ष देण्यात यावे.

श्री.सुर्यकांत जायभाये :आपण नियमीत बैठका घेवून वसुलीसाठी प्रयत्न करतात वसुलीसाठी कर्मचारी येतात परंतु अदयाप नागरीकांना डिमांड नोटीसच दिलेल्या नाही तर वसुली कशी होणार

मा.सभापती :सभागृहात स.सदस्यांनी चर्चा करून या अर्थसंकल्पात ज्या काही त्रुट्या असतील त्या दुरूस्त करून हे बजेट मंजूर करण्याचे अधिकार मला दिले जो विश्वास माझेवर टाकला त्याबध्दल सर्वांना धन्यवाद शासनाने जकात बंद करून स्थानिक संस्था कर लागू करण्याचे निर्देश दिले त्यावर सदस्यांनी चर्चा केली माहिती प्रमाणे पुढील 7-8 महिण्यात जीएसटी लागू होणार आहे.आता शासनाच्या निर्णयानुसार एलबीटी लावण्या संदर्भात जी तयारी करणार त्यात स्टेशनरी छपाई, कर्मचा-यांच्या नियुक्त्या व त्यांना प्रशिक्षण देणार तोपर्यत जीएसटी लागू होण्याची वेळ येईल त्यासाठी प्रशासनाने शासनाचे जे संबधीत अधिकारी किंवा मा.मुख्यमंत्री यांचेकडे विनंती, आग्रह धरावा की, जर जीएसटी 4-6 महिण्यात लागू होत असेल तर आता उपकर लागू करण्यासाठी जी यंत्रणा सज्ज कार्यान्वित व मेहनत करावी लागणार ते महापालिकेला खर्चाचे होईल त्यामूळे जीएसटी लागू होईपर्यंत जकातच चालू ठेवण्याची विनंती करावी.जे बजेटमध्ये प्रशासनाने उद्दिष्ट दिले तेच सदस्यांच्या भावना लक्षात घेता जशाच्या तसे मंजूर करणार आहे.वसुलीत व विकास कामात ही वाढ सुचवित नाही.उलट जे मार्गदर्शन करता येईल ते आम्ही करू. वसुलीवर थोडक्यात खुलासा केला वसुलीचे जे उद्दिष्ठ आहे ते प्रशासनाने पुर्ण करावे जे बजेटमध्ये कोणती वाढ करीत नाही व सर्वसाधारण सभेत सुध्दा वाढ होणार नाही मा. महापौर यांचेशी या संदर्भात चर्चा झाली आहे.परंतु मागिल वर्षी बजेटमधील कामे पुर्ण करावी. अनेक कामे शेवटच्या स्टेपवर आलेली आहे ती सर्व कामे करावी .प्रत्येक वार्ड कमेटीसाठी 5 कोटीचे तरतुद केली जात असे तरीही कामे होत नव्हते सदस्य सांगतात त्यानंतर सन 2010-11 मध्ये प्रत्येक

वार्ड समितीसाठी 2.50 कोटी ठेवले हा खर्च कोठे झाला याचा आढावा घेतला असता असे लक्षात आले की प्रत्येक वार्ड कमेटीनुसार 2.50 कोटीतून फक्त 5-10 लक्षची कामे झाली आहे ड्रेनेज, पाण्याची लाईन असे एखादे ए-1 मधील काम झाले असेल उर्वरीत रक्कमेची कामे अंदापत्रकात, एजन्सी फिक्सींगसाठी आहे. काल पेपरला आले 143 ए-1 ची कामे झाली हे सर्व कागदावरच होते परंतु कोणती लाईन कोठून कुठपर्यंत टाकली हे नगरसेवकांना माहित नसते.या बजेटमध्ये प्रत्येक वार्डासाठी 5.00 लक्ष रूपये देखभाल दुरूस्तीसाठी ठेवण्यात येते त्याची प्रशासनाने अमलबजावणी त्वरीत करावी. 25 हजार रक्कमेच्या वर काम जात असेल तर स.सदस्यांचा तेथे निधी वापरावा 5-5 लक्षच्या कामाच्या निविदा काढायच्या किंवा कसे प्रशासनाने ठरवावे परंतु 25 हजारच्या वरील काम आहे करणे आवश्यक आहे असे संबधीत कार्य.अभियंता वार्ड अभियंता यांनी प्रपोज केले पाहिजे.जे की निविदाची जाहिरात देण्याचा खर्च वाचेल 50,000, 1.00 लक्ष पर्यतचे काम असेल तर निविदा काढण्यास हरकत नाही रेटलिस्टची कामे माझे मते आता बंद करावे. 20 वर्षापूर्वी रेटलिस्टची संकल्पना होती त्यावेळी सिमेंट बँगची किंमत 20 रू  आता 300 रू झाली. 3000/- रेटलिस्टचे कामात 100-150 रू. काम जागेवर होत नाही असे लक्षात येते. त्यामूळे रेटलिस्टची कामे बंद करावी. ए-1 ची कामे ही प्रत्यक्ष जागेवर पाहणी केल्यानंतर तसेच संबधीत वार्डाचे स.सदस्य यांची काम करण्यास शिफारस व त्यांना कल्पना असल्याशिवाय अशी कामे करू नये.3000/-रेटलिस्टचे काम ए-1 मध्ये म्हणजे 25000/-मध्ये घ्यावे.25 हजारचे काम पुर्णपणे रद्य करून  बी-1 च्या रक्कमेत घ्यावे 25000 रक्कमचे काम हे वार्ड अभियंता यांना करण्याचे अधिकार देण्यात येते.प्रशासनाने तात्काळ अमलबजावणी करावी. 3000/-रेटलिस्टचे काम बंद करावे वार्ड समितीसाठी 2.50 कोटीची तरतूद होती आता 50 लक्षची तरतूद करण्यात येते.50 लक्ष खर्च करतांना संबधीत वार्डाचे स.सदस्य यांची काम करण्या बाबत शिफारस पत्र घेणे व कुठे काम केले याची माहिती देणे आवश्यक आहे व 5 लक्षचे प्रत्येक वार्डात काम करतांना त्यासाठी मा.आयुक्ताची मंजूरी घेणे सुध्दा आवश्यक आहे.पुर्वीच्या तरतुदीनुसार आणखी 5 कोटी शिल्लक राहतात ही रक्कम त्या कमेटीच्या अंतर्गत येणा-या वार्डात तातडीने काम करण्याची गरज आहे त्या ठिकाणी प्रत्यक्ष मा.आयुक्तांनी पाहणी करावी व अशी कामे करण्यास मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकारात करावे एका वार्डात किती रक्कमेचे काम करावे याची मर्यादा ठेवावी.प्रत्येक वार्डात प्रत्येक वर्षी ड्रेनेज व पाणीपुरवठयावर लाखो रूपये खर्च होतात  शहराचा डीपीआर तयार आहे त्याचा अधार घेवून किमान पुढील 15 वर्षाची लोकसंखा विचारात घेवून त्यानुसार प्रत्येक वार्डातील ड्रेनेज लाईनचा नकाशा तयार करण्यासाठी वार्ड अभियंता व संबधीत कार्य. अभियंता यांना प्रशासनाने आदेशीत करावे जेथे लाईन दुरूस्तीचे काम निघेल व नवीन लाईन टाकण्याची गरज पडते अशा वेळी तेथे ज्या व्यासाची लाईन असते तशी न टाकता मोठया व्यासाची लाईन टाकण्यात यावी भविष्यात महापालिकेला त्यावर खर्च करावा लागणार नाही.जर कुणी चुकीने काम करतील तर त्या संबधीतावर कार्यवाही करावी व

खर्च झालेली रक्कम वसुल करावी अशा पध्दतीने काम केल्यास 50 टक्के रक्कमेतून लाईन टाकल्या असे शासनास सांगता येईल व शासनाकडून येणारा निधी हा सिव्हरेज लाईनसाठी वापरता येईल देखभाल दुरूस्ती व इतर नवीन कामे टेंडरमध्ये असेल किंवा चालू करणार आहे अशी कामे 6 लक्षची असेल ती 12 लक्षपर्यंत झाले तरी चालेल परंतु पुन्हापुन्हा ती कामे करण्याची गरज पडणार नाही 15 वषापर्यंतच्या लोकसंख्येचा विचार करून ती कामे करावी जी कामे 2-2 वेळेस रिकॉल करूनही ठेकेदार घेणेस तयार नसतील अशी कामे स्थायी समिती समोर आणावी.व जी कामे ठेकेदाराने घेतली आहे व 2 टक्के रक्कम भरण्यास तयार नसेल तर त्या एजन्सीला काळया यादीत समावेश करावा निविदेतील दुसऱ्या क्रमांकाचे एजन्सीला ते काम दयावे किंवा पुन्हा रिकॉल करावे. डांबरीकरणाची कामे ठेकेदार करण्यात तयार नसतील व ती कामे इन्टरनल गल्ल्यामध्ये असेल तर ते रस्ते सिमेंटचे करण्यास हरकत नाही. ऐनवेळी नगररचना विभागाचा प्रस्ताव आलेला आहे बजेटच्या नंतर आला यानंतर असे होवू नये सुधारीत मध्ये यास मंजूरी देण्यात येते.

श्री.विकास जैन :ठळक वैशिष्टये मध्ये बीओटीवर जे डायग्नोस्टिक सेंन्टर करणार आहे त्याचाही विचार करावा.

श्री.सुर्यकांत जायभाये :या बजेट मध्ये मंजूरी देत असतांना आपण नवीन कोणतीही कामे घेतलेली नाही बजेचा ताळमेळ ठेवण्याच्या दृष्ठीने हा योग्य निर्णय आहे आम्हाला तो मान्य आहे परंतु शहरात 30 वार्ड हे गुंठेवारीत येतात.अधिकारी सांगतात गुंठेवारीत काम करू शकत नाही गुंठेवारी रोखूही शकत नाही. सन 2001 मध्ये शासनाने गुंठेवारीत अनधिकृत कामावर बंदी घातलेली आहे असे असतांना गेल्या 15 वर्षात या शहरात अनेक लहान मोठया कॉलन्या निर्माण झालेल्या आहे.यास प्रशासन जबाबदार आहे एकीकडे वसाहती होण्यास रोखू शकत नाही व झाली तर तेथे कामही करू शकत नाही.सन 2001 च्या पूर्वी पुंडलिकनगर भाग हा एक कॉलनी होती परंतु आता मुकूंदवाडी ते बीडबाय पास पर्यंत शेकडो वसाहती झाल्या येथे नागरीक राहतात त्यांचे आरोग्याकडे लक्ष देण्याची महापालिकेची जबाबदारी आहे सन 2001 पुर्वी ज्या वसाहती झाल्या तेथे महापालिकेने तसेच खासदार,आमदार निधीतून कामे केली तेंव्हा केलेली कामे आता दुरूस्तीला आली आहे उदा. रस्ते डांबरीकरण केले ते दुरूस्तीचे काम असेल या भागातील अशी कामे झाली पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रत्येक वार्डसाठी आपण 5 लक्षची तरतूद केली गुठेंवारी भागासाठी तरतूद करूनही तेथील कामे होत नाही विनंती की, गुंठेवारीचे जे वार्ड असतील त्या वार्डसाठी आणखी 5 लक्षची तरतूद जास्तीची करावी त्यात सर्व विकास कामे करता येईल.आताच आपण म्हटल्या प्रमाणे या भागातील ही कामेही वार्ड कार्यालय, वार्ड अभियंता यांचे अंतर्गत करावे 25 लक्षच्या वरील काम असेल मा.आयुक्त, कार्य.अभियंता यांचे मार्फत व्हावे.

श्री.मधुकर सावंत :प्रत्येक वार्डात कमी अधिक गुंठेवारी भाग येतो 2001 पुर्वीच्या वसाहती गुंठेवारी येतात परंतु त्यानंतरही अनेक वसाहती झाल्या सन 2006-07 पर्यंतच्या वसाहती गुंठेवारी घ्याव्यात असे शासनाकडे प्रशासनाने किंवा स्थायी

समितीच्या मार्फत विनंती करावी जेणे करून या भागात विकास कामे करता येतील व वसुलीही होईल.

श्री.विजय वाघचौरे :गुंठेवारीत यापूर्वी रस्त्याची कामे झालेली आहे तेथील दुस्तीची कामे करण्यात यावी.जेटींग मशीन खरेदी करणार होते.

मा.सभापती :जेटींग मशीन साठी टेंडर झालेले आहे येणा-या बैठकीमध्ये ते येईल.3-4 जेटींग मशीन घेणार आहेत.

मा.आयुक्त :वसूलीवर चर्चा चालू असतांनाच मा.सभापती यांनी त्यांचेकडील 34,151/- इतक्या रक्कमेचा टॅक्स ॲडव्हॉन्स मध्ये जमा केलेला आहे त्यांचे ख-या अर्थाने अभिनंदन करायला पाहिजे. जेंव्हा आपण नागरीकांना टॅक्स भरण्या बाबत आग्रह करतो या निमित्ताने अधिकारी /कर्मचारी यांना सुध्दा माझे आवाहन राहिल की त्यांनी सुध्दा आपल्याकडील प्रॉपर्टीचा टॅक्स भरणा करावा.यानंतर वसुली करण्यावर जास्त भर दिला जाणार आहे.

मा.सभापती :स.सदस्या सौ.साधना सुरडकर यांनी त्यांचेकडील टॅक्स भरणा केल्याची पावती दिली आहे त्यांचे अभिनंदन करतो सर्व अधिकारी /कर्मचारी व स.सदस्यांना विनंती राहिल की, ज्यांनी त्यांनी आपआपल्या मालमत्तेचा कर भरावा. जेणे करून नागरीकांना सुध्दा कर भरावा म्हणून मागणी करता येते आताच स.सदस्य यांनी गुंठेवारीत कामे करावी म्हणून मागणी केली. मा.आयुक्तांशी चर्चा केली सभागृहात निर्णय घेतला तरी तेथे काम करता येत नाही. या भागात विकास कामे करता यावी व तेथे स.सदस्यांना निधी सुध्दा वापरता यावा व देखभाल दुरूस्तीचीही कामे व्हावीत यासाठी शासनाकडे मान्यतेची मागणी करणार आहे.

श्री.नासेरखान :सन 2010-11 च्या बजेटमधील वार्डात 55 हजार रक्कमेपर्यंतची कामे झाली नाही आता सुधारित बजेट मंजूरीसाठी आले 1 एप्रिल पासून जकात बंद होणार यानंतर विकास कामे होतील असे वाटत नाही जकातीबाबत प्रशासनाचा खुलासा दाखविण्यापूरता आहे यापूर्वी 250 कर्मचारी नाक्यावर दिले होते वसुली झाली नाही.आता 173 कर्मचारी देण्या बाबत चर्चा होते.परंतु वसुली होत नाही मागिल बजेटमधील कोणतेही काम केले नाही. कामे परत केले.भविष्यात कामे होतील खात्री नाही. 3-3 वेळेस शहर अभियंतांना बोलूनही 1 हजार रक्कमेचे काम होत नाही. कोणाच्या वार्डात कामे झाली सदस्यांनी सांगावे.बजेटमध्ये दुरूस्ती वगैरे हे सर्व दाखविण्यासाठी आहे. कामे होत नाही.

मा.सभापती : जे बजेटमध्ये टाकलेली कामे सर्व कामे प्रशासनाने या वर्षीच करावी. स्पील ओव्हरमध्ये जाणार नाही याची दखल घ्यावी व रद्द होणार नाही याची दखल घ्यावी. प्रत्येक वार्डसाठी 5 लक्ष रक्कम ठेवली आहे देखभाल दुरूस्तीची कामे यातून करावी.

श्री.नासेरखॉन :माझे वार्डात एकूण 176 लाईट आहे एक महिण्यात 50 लाईट बंद पडतात एका लाईटची किमंत 8000 इतकी आहे.हा निधी कमी पडणार आहे.आज वार्डात 76 पोलवरील लाईट बंद आहे अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी दिल्या काम झाले नाही.

मा.सभापती :ही परीस्थिती सुधारण्यासाठी सिस्टम करीत आहोत. महापालिकेच्या वतीने ठेकेदारानी कामे केली तर अमुक ठिकाणी काम केले नाही प्रत्यक्ष बोलता येते.शासनाने जकात कन्टीन्यूव केले नाही प्रशासनाने शासनाला पत्र देवून कळवावे की ज्यावर एलबीटी लावणार आहे त्या बाबतीत व्यत्यय आणू नये. नियमानुसार तसे केले तर जकात पेक्षा एलबीटीतून महापालिकेला जास्त उत्पन्न मिळेल. एमएसईबीच्या बीलावर 1 टक्का प्रमाणे 600 कोटी महापालिकेला मिळू शकेल.जेथे उत्पन्न मिळते तेथे उपकर लावावा असे म्हटले आहे. एमएसईबीवर देयके, युनीट कन्झुम होतात, त्यावर लावावे. नसता जकात चालू रहावी म्हणून शासनास तसे कळवावे.या बजेटला दुरूतीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2010-11 चे सुधारीत व 95 नुसार सन 2011-2012 चे मुळ अंदाज मा.स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यात आले.

सन 2010-11 चे सुधारीत व सन 2011-12 च्या मुळ अंदाजावर सर्व सन्माननीय सदस्यांनी अभ्यासपुर्वक सखोल चर्चा करून प्रशासनाने सादर केलेल्या मुळ अंदाजामधील असलेल्या त्रुट्या दुर करून व केलेल्या सूचनांची दखल घेऊन सन 2010-2011 चे सुधारीत अंदाज रू.284 कोटी 40 लाख 25 हजार जमा, प्रारंभीची शिल्लक रू.05 कोटी 26 लक्ष 92 हजारसह एकुण रू.289 कोटी 67 लाख 17 हजार जमा व खर्च रू.289 कोटी 38 लाख 70 हजार विचारात घेऊन रू.28 लाख 47 हजार शिलकीचे सुधारीत अंदाज तसेच सन 2011-2012 चे मुळ अंदाज रू.382 कोटी 20 लाख 25 हजार जमा, प्रारंभीची शिल्लक रू.28 लक्ष 47 हजारसह एकुण रू.382 कोटी 48 लाख 72 हजार जमा व खर्च रू.382 कोटी 34 लाख 70 हजार विचारात घेऊन रू.14 लाख 02 हजार शिलकीचे अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावास तसेच ऐनवेळी नगर रचना विभागाने प्रिमियम आकारणी बाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येते. वॉर्ड क्र.01 ते 99 करीता प्रत्येकी रू.5.00 लक्ष देखभाल दुरूस्तीच्या कामाकरीता तसेच प्रभाग कार्यालय अ ते फ प्रत्येकी रू.1.00 कोटी व तातडीच्या कामाकरीता रू.4.00 कोटी मा.आयुक्त यांच्या अधिकारात देखभाल दुरूस्तीच्या कामांसाठी प्रशासनाने सादर केलेल्या देखभाल दुरूस्तीच्या तरतुदीमधुन उपलब्ध करून देण्यांत येते. या दुरूस्तीसह मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यांत येते. व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 नुसार अंतिम मान्यतेकरीता मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

नगरसचिव,
महानगरपालिका औरंगाबाद